**प्रेसनोट दि. २६.०८.२०२१**

लोकसेवीका श्रीमती कौशल्या हणमंत भोसले वय ३२ वर्ष वन परिक्षेत्र अधिकारी (वनक्षेत्रपाल), वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय तासगांव ता. तासगांव जि. सांगली वर्ग -२ रा.शासकीय निवास्थान वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय तासगांव ता. तासगांव जि. सांगली मुळ रा.मु.पो. चांदणी चौक, रहिमतपुर ता. कोरेगांव जि. सातारा व श्री. श्रीकांत तुकाराम शिंदे वय ४३ वर्ष डाटा ऑपरेटर रा. मु.पो. मणेराजुरी ता. तासगांव जि. सांगली यांना लाच स्विकारलेबाबत कारवाई सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

---

तक्रारदार त्यांचे मालकीचे ट्रकमधून लाकूड वाहतूक करीत असताना श्रीमती भोसले, वनक्षेत्रपाल यांनी आडवून कारवाई कामी वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय तासगांव ता. तासगांव जि. सांगली या ठिकाणी लावला होता सदरचा ट्रक सोडणे कामी श्रीमती भोसले, वनक्षेत्रपाल व श्री. शिंदे डाटा ऑपरेटर यांनी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.२४.०८.२०२१ रोजी दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि. २५.०८.२०२१ रोजी व दि.२६.०८.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये तक्रारदार यांचा ट्रक सोडण्याकरीता लोकसेवीका श्रीमती भोसले, वनक्षेत्रपाल यांनी तक्रारदार यांचकडे ३०,०००/- रूपये लाचेची मागणी करून सदरची लाच रक्कम डाटा ऑपरेटर श्री. शिंदे यांचेकडे देण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय तासगांव या ठिकाणी सापळा लावला असता श्री. श्रीकांत तुकाराम शिंदे वय ४३ वर्ष डाटा ऑपरेटर रा. मु.पो. मणेराजूरी ता. तासगांव जि. सांगली यांनी तक्रारदार यांचकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून ३०,०००/- रूपये स्विकारलेनंतर त्यांना पकडण्यात आले असून लोकसेवीका श्रीमती कौशल्या हणमंत भोसले वय ३२ वर्ष वन परिक्षेत्र अधिकारी (वनक्षेत्रपाल), वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय तासगांव ता. तासगांव जि. सांगली वर्ग -२ रा.शासकीय निवास्थान वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय तासगांव ता. तासगांव जि. सांगली मुळ रा.मु.पो. चांदणी चौक, रहिमतपुर ता. कोरेगांव जि. सातारा यांना वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय तासगांव ता. तासगांव येथून ताब्यात घेतले आहे.

लोकसेवीका श्रीमती कौशल्या हणमंत भोसले वय ३२ वर्ष वन परिक्षेत्र अधिकारी (वनक्षेत्रपाल) वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय तासगांव ता. तासगांव जि. सांगली वर्ग -२ रा.शासकीय निवास्थान वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय तासगांव ता. तासगांव जि. सांगली मुळ रा.मु.पो. चांदणी चौक, रहिमतपुर ता. कोरेगांव जि. सातारा व श्री. श्रीकांत तुकाराम शिंदे वय ४३ वर्ष डाटा ऑपरेटर रा. मु.पो. मणेराजुरी ता. तासगांव जि. सांगली यांचे विरुध्द तासगांव पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री. सुरज गुरव सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री सुहास नाडगोडा सो, श्री. अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री. गुरुदत्त मोरे पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, धनंजय खाडे, संजय संकपाळ, सलिम मकानदार, अजित पाटील, राधिका माने, विना जाधव, श्रीपती देशपांडे, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर [illegible] व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सत्यमेव जयते

Scanned with CamScanner